# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : ३७२८/ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

दिनांक 23 FEB 2020

**: : परिपत्रक : :**

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगमी सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे. मा.सदस्यांकडून प्रवेशपत्रिकांची मागणी वारंवार करण्यात येत असल्याने प्रवेशपत्रिका वितरणासंबंधी खालीलप्रमाणे कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.

(१) मा.पीठासीन अधिकारी व विरोधी पक्षनेते यांना रोज रीतसर कार्यपध्दतीप्रमाणे दैनंदिन ५ प्रवेशपत्रिका देण्यात येतील.

(२) मा.मंत्रीमहोदय यांना दैनंदिन ५ प्रवेशपत्रिका देण्यात येतील. सदर प्रवेशपत्रिका संबंधित मान्यवरांच्या स्वाक्षरीने अथवा खाजगी सचिवांच्या सहीचे लेखी पत्र प्राप्त झाल्यावर वितरीत करण्यात येतील.

(३) सन्मा. सदस्यांच्या दैनंदिन दोन अभ्यांगतांना संबंधीत पक्ष कार्यालया मार्फत प्रवेश पत्रिका देण्यात येतील.

(४) मा.सदस्यांच्या स्वाक्षरीचे लेखी पत्र प्राप्त झाल्यानंतर दोन अभ्यागतांना दैनंदिन प्रेक्षक गॅलरी प्रवेशपत्रिका देण्यात येतील. सदर गॅलरी प्रवेश सुरक्षा विभागाच्या देखरेखी व नियोजनाखाली देण्यात येईल.

(५) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(६) सभागृहाच्या कामकाजाचे प्रत्यक्ष अवलोकन करता यावे याकरिता मुख्याध्यापक अथवा प्राचार्याकडून अधिवेशन सुरु होण्याच्या १५ दिवस अगोदर लेखी अर्जाद्वारे विनंती करण्यात आल्यानंतर मा.पीठासीन अधिकारी यांच्या पूर्वअनुमतीने शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणालीची जवळून माहिती होण्यासाठी एका वेळी जास्तीत जास्त ४५ विद्यार्थ्यांना गॅलरी प्रवेशपत्रिका देण्यात येतील.

वरीलप्रमाणे प्रवेशपत्रिका वितरणासंबंधी सर्व मा.सदस्यांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

( रविंद्र जगदाळे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रत :

**(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.**
**(२) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव.**
**(३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.**
**(४) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.**
**(५) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी.**
**(६) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी.**
**(७) मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव.**
**(८) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई.**

.. प्रत माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी.

D:\BUDGET SESSION 2020\PASS SECTION\PARIPATRAK.docx